सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# उपविभागीय दंडाधिकारी, मूल यांचे कार्यालय

ईमेल आयडी – sdo.mul@gmail.com दुरध्वणी क्रमांक 07174-220310

क्रमाक कावी/कलि/प्रस्तु-3/2020/315 दिनांक – 4 /09/2020

संदर्भ :- 1.आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005, कलम 34(C)34 (M)

2. भारतीय साथ रोग नियत्रंण अधिनियम 1897,
3. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मूंबई-32 यांची दि 13 मार्च,2020 ची अधिसुचना
4. केंद्र शासन गृह विभाग आदेश क्र 40-3/2020-DM-I(A) दि 01.05.2020. आणि 29/08/2020
5. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पूर्नवसन, मुंबई अधिसुचना क्र DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 02.05.2020
6. केंद्र शासन गृह विभाग आदेश क्र 40-3/2020DM-I(A) दि 17.05.2020. दि 30.05.2020
7. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पूर्नवसन, मुंबई अधिसुचना क्र DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 17.05.2020,19.05.2020,31.05.2020,29.06.2020 व दि.31/08/2020
8. मा.जिल्हाधिकारी,चंद्रपूर यांचे पत्र क्र.एमएजी/कार्या-8/टे-3/साले/2020/485 दिनांक 21 मे,2020
9. तहसिलदार,मूल यांचे पत्र क्र कावि/अका/ना.ना./2020/252 दि 20/08/2020
10. या कार्यालयाचे आदेश क्र. कावी/अका/प्रस्तु-1/2020/414 दि. 20/08/2020
11. तहसिलदार,मूल यांचे पत्र क्र कावि/अका/ना.ना./2020/303 दि 04/09/2020

## आदेश

ज्याअर्थी महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय,मूंबई दिनांक 13 मार्च,2020 च्या अधिसुचनेन्वये राज्यात कोरोना विषाणूमूळे (COVID-19) उध्दव-या संसर्गजन्य आजारामूळे आरोग्य विषयक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली आहे. व या विषाणूमूळे उध्दवलेल्या संसर्ग रोगाच्या नियत्रंणास्तव आपत्कालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाल्यामूळे राज्यात साथरोग अधिनियम, 1897 मधील खंड 2,3,व 4 ची अंमलबजावणी अधिसुचनेच्या दिनांकापासून लागू करून जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे. संदर्भिय पत्र क्र.8 अन्वये उपविभागीय दंडाधिकारी, मुल यांना सक्षम प्राधिकारी म्हणून प्राधिकृत केलेले आहे.

ज्याअर्थी केंद्र शासन व राज्य शासनाने मार्गदर्शक सुचना निर्गमित करून दिनांक 30 सप्टेंबर, 2020 पावेतो संपूर्ण महाराष्ट्रात लॉकडाऊन लागू राहील असा आदेश करण्यात आला आहे.

आणी ज्याअर्थी चंद्रपूर जिल्हयातील **मौजा फिस्कुटी तालूका मूल जिल्हा चंद्रपूर** या भागात कोरोना बाधीत रूग्ण आढळून आल्याने व त्यांचा प्रादूर्भाव इतर भागात पसरू नये याकरीता सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टिने तसेच गावातील नागरीकांचे हित व सूरक्षेस्तव अधिकची उपाय योजना तातडीने करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी भारत सरकार आरोग्य व कूंटूब कल्याण मंत्रालय दिल्ली यांनी Novel Coronavirus Disease 2019(COVID-19) बाबत Cantaintment Plan निर्धारित केला असून त्यानुसार कोरोना विषाणूव्दारे बाधीत व्यक्ती / समुदायच्या केंद्रबिदू परिसरापर्यत नागरीकांची हालचाल / फिरणे / संपर्क या निर्बंध घालून मज्जाव करणेबाबत निर्देशित केले आहे.

त्याअर्थी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 च्या कलम 34(C) व 34 (M) आणि फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 अंतर्गत चंद्रपूर जिल्हयातील **मौजा फिस्कुटी तालूका मूल जिल्हा चंद्रपूर** येथील इतर भागात कोरोना विषाणूचा संसर्ग इतर नागरीकांना होऊ नये या दृष्टिने या कार्यालयाचे संदर्भिय क्र. 10 आदेशान्वये सदर भागाच्या सिमा बंद करण्याचा आदेश देण्यात आलेला आहे.

त्याअर्थी संदर्भिय क्र. 11 पत्रान्वये **तहसिलदार , मूल** यांनी चंद्रपूर जिल्हयातील **मौजा फिस्कुटी** तालूका मूल या गावात इतर कोणतेही कोरोना पॉझिटीव रुग्ण आढळून न आल्याबाबत सादर केलेल्या अहवालानुसार संदर्भिय क्र. 10 आदेशानवये चंद्रपूर जिल्हयातील **मौजा फिस्कुटी** तालूका मूल या गावातील प्रतिबंधित केलेल्या क्षेत्राचे सिमा याव्दारे पुर्ववत सुरु करण्यास काहीही हरकत नाही अशी माझी खात्री झालेली आहे.

आणि त्याअर्थि चंद्रपूर जिल्हयातील **मौजा फिस्कुटी** तालूका मूल या गावातील प्रतिबंधित केलेल्या क्षेत्राच्या सिमा या आदेशान्वये पुर्ववत सुरु करण्यात येत आहे.

सदर आदेश आज दिनांक 04 सप्टेंबर, 2020 रोजी, माझे सही व शिक्केनिशी निर्गमीत करित आहे.

5/9/20

(एम.खेडकर)
उपविभागीय दंडाधिकारी तथा
Sub Divisional Magistrate, Mul
Sub Divisional Incident Commander
मूल

प्रतिलिपी- माहितीस्तव सविनय सादर,

1. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय,मूंबई
2. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
3. मा. जिल्हादंडाधिकारी,चंद्रपूर
4. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,चंद्रपूर
5. मा. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीस रवाना,

1. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. चंद्रपूर
2. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर
3. उपविभागीय पोलीस अधिकारी, मूल
4. तहसिलदार , मूल
5. वैद्यकिय अधिक्षक, उप जिल्हा रुग्णालय, मूल
6. संवर्ग विकास अधिकारी, पं.स. मूल
7. पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन मुल
8. तालुका आरोग्य अधिकारी, मूल

(एम.खेडकर)
उपविभागीय दंडाधिकारी तथा
Sub Divisional Magistrate, Mul
Sub Divisional Incident Commander
मूल